673

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

कल्पतरु पॉईंट इमारत, ३रा व ४था मजला,
सायन माटुंगा स्किम रोड नं.८,
सीनेप्लॅनेट सिनेमासमोर, सायन सर्कलजवळ,
सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

जावक क्रमांक :मप्रनि/विशा/ण, ४८८
दिनांक :०८/१/२००५

प्रति,

प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुख्यालय/मुंबई/नवी मुंबई/ठाणे/कल्याण/रायगड/पुणे/औरंगाबाद/नागपूर/
नाशिक/कोल्हापूर/अमरावती/प्रकल्प व योजना/झोनींग ॲटलास

उप-प्रादेशिक अधिकारी
मुंबई-१/मुंबई-२/मुंबई-३/मुंबई-४/जल/हवा/धुम्र(मुख्यालय/ठाणे-१/ठाणे-२/
ठाणे-२/तारापूर-१/तारापूर-२/नवी मुंबई-१/नवी मुंबई-२/तळोजा/कल्याण-१/
कल्याण-२/कल्याण-३/रायगड-१/रायगड-२/रायगड-३/महाड/कोल्हापूर/सांगली/
रत्नागिरी/चिपळूण/पुणे-१/पुणे-२/पिंपरी-चिंचवड/सातारा/सोलापूर/औरंगाबाद-१/
औरंगाबाद-२/औरंगाबाद-३/नांदेड/नाशिक/अहमदनगर/जळगाव-१/जळगाव-२/
नागपूर-१/नागपूर-२/नागपूर-३/चंद्रपूर/अमरावती-१/अमरावती-२/अकोला.

## स्थायी आदेश

स्थानिक स्वराज्य संस्थांकडे असलेल्या उपकराच्या थकबाकी वसुलीबाबत आढावा घेतला असता असे आढळून आलेले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्था जल उपकर वेळच्यावेळी भरत नाहीत आणि सदरहू उपकर भरण्याबाबत त्या उदासीन असलेल्या दिसतात. अशा वेळी प्रादेशिक अधिकारी आणि संबंधीत उप-प्रादेशिक अधिकारी यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचे मुख्याधिकारी आणि आयुक्त यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन वसुलीबाबत पाठपुरावा करणे गरजेचे आहे. कारण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर संबोधण्यात आलेले असून १९९६-१९९७ पासून मंडळाचे सर्व खर्च मंडळाच्या महसूल उत्पन्नातून भागविले जात आहेत. त्यामध्ये जल उपकर हे महत्वाचे उत्पन्न असून या उपकरातून केंद्र सरकारकडून प्राप्त झालेल्या परताव्यातून मंडळाचे बहुतांश खर्च भागविले जातात.

वरील परिस्थिती विचारात घेता मंडळाचे प्रादेशिक अधिकारी आणि उप-प्रादेशिक अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांकडून जल उपकर गोळा करण्याकरिता विशेष मोहीम राबविणे गरजेचे आहे. मात्र, बहुतेक प्रादेशिक अधिकारी आणि उप-प्रादेशिक अधिकारी जल उपकर वसुलीबाबत आवश्यक ते लक्ष घालत नसल्याचे आढळतात. स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यादेखील उपकर भरण्याच्या काही अडचणी असू

674



शकतात. मात्र त्यासाठी वैयक्तिक स्तरावर तेथील मुख्याधिकारी/आयुक्त किंवा संबंधीत अधिकारी यांच्याशी संपर्क साधून, त्यांच्या अडी-अडचणी विचारात घेऊन आणि त्यावर योग्य ती उपाय-योजना शोधून वसुलीचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. प्रादेशिक अधिकारी यांनी संबंधीत उप-प्रादेशिक अधिकारी यांच्याबरोबर प्रत्यक्ष भेटी देऊन उपकर वसुलीबाबत पाठपुरावा करावा व त्याप्रमाणे त्रैमासिक अहवाल सदस्य सचिव यांच्याकडे पाठवावा.

मुख्यालयात घेण्यात आलेल्या आढाव्यानुसार असे ठरविण्यात आलेले आहे की, संबंधीत विभागातील प्रादेशिक अधिकारी, उप-प्रादेशिक अधिकारी आणि मुख्यालयातील मुख्य लेखा अधिकारी व वरिष्ठ विधी अधिकारी यांचा एक गट दर तीन महिन्यानंतर एकदा वेगवेगळया विभागातील स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडील उपकर थकबाकीबाबत संबंधीत मुख्याधिकारी/आयुक्त/संबंधीत अधिकारी यांना भेटून, त्यांच्याशी चर्चा करुन उपकर थकबाकी वसुल करण्याबाबत योग्य तो पाठपुरावा करेल. सदरहू गटाने दिलेल्या अहवालानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

( दि. भा. बोराळकर )
सदस्य सचिव

प्रत माहितीसाठी सविनय सादर- मा.अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ, मुंबई.

प्रत माहितीसाठी रवाना-जल प्रदूषण निवारण अभियंता/हवा प्रदूषण निवारण अभियंता/मुख्य लेखा अधिकारी/प्रधान वैज्ञानिक अधिकारी/वरिष्ठ विधी अधिकारी (विशा/मुख्यालय), म.प्र.नि.मंडळ, मुंबई.

प्रत माहितीसाठी : उप-प्रादेशिक अधिकारी/लेखा अधिकारी, उपकर शाखा, म.प्र.नि.मंडळ, मुंबई.